दुरध्वनी क्रमांक: 0240-254200
फॅक्सक्रमांक : 0240-2654247
ई-मेल :srpfgr14@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
भारत राखीव बटालियन -1
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14,
सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर-431010.

जा.क्र.आस्था/भाराब-१/विधी निदेशक- नेमणूक/२०२५/ 114 छत्रपती संभाजीनगर दि. 06/०१/२०२५.

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रं-१४ (भाराब-१) छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर खालील नमूद केलेली विधी निदेशक यांचे एक पद ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.

| अ.क्र | पदनाम | सध्याची रिक्त पदे |
|---|---|---|
| ०१ | विधी निदेशक | ०१ |

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज व संबधीत कागदपत्रे समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रं-१४ (भाराब-१) छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास दिनांक २५/०१/२०२५ पर्यन्त पोहचतील या बेताने srpfgr14@gmail.com या संगणक संकेत स्थळावर पाठवावेत.

**करारातील मासिक देय रक्कम**

विधी निदेशक या पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम रु २०,००० + ३००० दुरध्वनी व प्रवासखर्च मिळून एकत्रित अनुज्ञेय राहील.

**शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा / अनुभव :-**

१ )उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

२) विधी निदेशक पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३ ) उमेदवारास संबधीत पदाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण ज्ञान असेल आणि तो संबधीत कायदयाचे प्रशिक्षण देण्यास सक्षम असेल

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल

५)शासन निर्णय, गृह विभाग, एसपीपी-२००९/९२२/प्र.क्र.१०९/पोल-१०, दिनांक १८/०६/२००९ नुसार विधी निदेशक पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**किवा**

६) जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्या विषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा किवा केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्ती बाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**विधी निदेशक यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देणे
२. पोलीस प्रशिक्षण शाळेत वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा परिक्षा तथा लेखी परिक्षा यासाठी प्रश्नसंच तयार करणे परिक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे, परिक्षांचा निकाल तयार करणे इ. परिक्षा विषयक बाबीमध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण) व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण शाळा यांना मदत करणे
३. पोलीस प्रशिक्षणा विषयक सर्व बाबी तथा वेळो नेमणू दिलेली कामे.

अटी व शर्ती

१) विधी निदेशक पदाची नेमणूक ही पूर्णता : कंत्राटी पध्दतीने असेल या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत : ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापी, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ०३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्य करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

५) उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६) नियुक्त केलेल्या उमेदवारास दिनांक १५/०९/२००६ च्या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट ब नुसार करारनामा (Agreement ) करणे अनिवार्य राहील.

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षधिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी अर्ज भरण्याच्या दिनांकास पुर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जा सोबत पासपोर्ट आकाराचे ( Pasport Size Photo ) सध्याचे काढलेले व स्वाक्षरी केलेले ०२ रंगीत फोटो जोडावेत.

१०) आपला विहीत नमून्यातील अर्ज व सोबतची कागदपत्रे या कार्यालयाचे संगणक संकेत स्थळ srpfgr14@gmail.com यावर पाठवावेत.

( विक्रम साळी )
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्रं-१४ (भाराब-१)
छत्रपती संभाजीनगर

# अर्जाचा नमुना
## विधी निदेशक पदा करिता अर्ज

**नियुक्तीचे इच्छूक ठिकाण :-**

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१) अर्ज क्रमांक

२) अर्ज स्विकारल्याचा दिनांक

३) अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी ( दिनांकासह )

**सुचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.**

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

- आवश्यक नसेल ते खोडावे

**अर्जदाराची वैयक्तीक माहिती :-**

**१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- -----------आडनाव--------------नाव----------------वडीलाचे/पतीचे नाव**

**मराठीत :-**

**इंग्रजीत :-**

**२) पत्रव्यवहाराचा पत्ता पीनकोडसह :-**

**३) कायमचा पत्ता पीनकोडसह :-**

**४) दुरध्वनी क्रमांक :- लॅन्डलाईन भ्रमणध्वनी e-mail address**

**५) जन्म दिनांक :- दिवस महिना वर्ष**

**६) दिनांक / /२०२४ रोजीचे वय**

**७) लिंग :- पुरुष/महिला**

**८) धर्म :- जात :-**

**९) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का**

**योग्य असेल तेथे ( ) अशी खूण करावी.**

**१०) शैक्षणिक अर्हता :-**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव ( विद्यालय/ महाविद्यालय | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१०वी ) अथवा जुनी ११वी | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा ( इं.१२वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

**११. इतर शैक्षणिक अर्हता :-** संगणक प्रशिक्षीत आहेत काय होय नाही

**१२. अर्जदाराची इतर माहिती :-**

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत : हाताळलेल्या केसेसचा तपशील :-

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

**टीप :- वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

**१३-अ** अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधा बाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/निवडीना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय. किवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून /संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आलीं आहे काय/काढून टाकण्यात आले आहे काय

**१३ - ब :-** हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही/शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबीत आहे काय

( १३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला , अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दि, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबीत असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे )

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/सौ/कु ------------------------------------------ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिकक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्यावर माझी निवड/नियुक्ती रद्य केल्यास त्या बाबत माझी काहीही तक्रार राहणारय नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्या बाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रकियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही

नाव व दिनाकासह

सोबत :- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रती.